# सभेचा कार्यवृत्तांत

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा सोमवार दि.८/१०/०७ रोजी दुपारी १-०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. एन. एन. मालदार - प्र. कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे | सदस्या |
| ३) | ॲड. रामदास पी. सब्बन | सदस्य |
| ४) | शिक्षण संचालक पुणे यांचे प्रतिनिधी शिक्षण सहसंचालक कोल्हापूर डॉ. बी. बी. कदम | सदस्य |
| ५) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ६) | प्रा. डॉ. एन. एन. मालदार, प्र.संचालक, म. व वि.वि.मं. - पदसिध्द | सदस्य |
| ७) | प्राचार्य जे. के. बिले | सदस्य |
| ८) | डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ९) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| १०) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| ११) | श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्या |
| १२) | श्री. पी. एम. हिरेमठ | सदस्य |
| १३) | श्री. व्ही. तिरुपती | सदस्य |
| १४) | प्रा. बी. पी. रोंगे | सदस्य |
| १५) | डॉ. डी. डी. रणनवरे | सदस्य |
| १६) | श्री. जयसिंह मोहिते-पाटील | सदस्य |
| १७) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम | सदस्या |
| १८) | श्री. एम. के. कौरथी - वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १९) | डॉ. एम. एस. शेजूळ - परीक्षा नियंत्रक तथा प्र.कुलसचिव | स्थायी निमंत्रित तथा सचिव |

सभा दुपारी १ वा. सुरु झाली. सभेच्या सुरुवातील प्र.कुलसचिव यांनी मा. प्र.कुलगुरु यांच्या परवानगीने सभेस सुरुवात केली. मा.प्र.कुलगुरु यांनी सर्व सन्माननीय व्यवस्थापन परिषद सदस्यांचे स्वागत केले. महामहिम राज्यपाल तथा कुलपती यांनी प्रा. डॉ. मालदार एन. एन. यांची प्रभारी कुलगुरु म्हणून नियुक्ती केल्याचे आणि दि.११/९/०७ रोजी त्यांनी कार्यभार स्वीकारल्याची माहिती मा.प्र.कुलगुरु यांनी दिली. सर्वांचे सहकार्य लाभले आहे आणि यापुढेही लाभेल असा विश्वास यावेळी मा.प्र.कुलगुरु यांनी व्यक्त केला.

विषयपत्रिकेनुसार सभेचे कामकाज सुरु करण्यापूर्वी सोलापूर विद्यापीठामध्ये ई-सुविधा प्रकल्पाचे लॉंचिंग मा.प्र.कुलगुरु यांच्या हस्ते झाले. यावेळी एम.के.सी.एल. चे श्री. योगेश बुचके यांनी ई-सुविधा प्रकल्पाची माहिती एल.सी.डी. वर दाखविली तसेच विद्यार्थ्यांना ई-सुविधाबाबत www.su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर संपूर्ण माहिती उपलब्ध असल्याचे सांगितले.

यानंतर विषयपत्रिकेनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**विषय क्र. १ - दि.१४ जून, २००७ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र. १ - दि.१४ जून, २००७ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्त्यांसह वाचून कायम करण्यात आला.**

**१) पान क्र. २ वर, उपस्थिती क्र. ४ मध्ये डॉ. बी. बी. कदम शिक्षण संचालक,**

**कोल्हापूर ऐवजी डॉ. बी. बी. कदम, शिक्षण सहसंचालक, कोल्हापूर अशी दुरुस्ती केली.**

**२) पान क्र. २ वर, ठराव क्र. १ (२) मध्ये, म.वि.का.१९९४ मधील २८ (फ) नुसार, "विद्यापीठाच्या वतीने करार करणे, त्यात फेरबदल करणे, ते पार पाडणे व रद्द करणे" अशी दुरुस्ती केली.**

**३) वकीलाचे मानधन, कायदेशीर बाबी व अनुषंगिक बाबी, वकीलाचे पॅनेल ठरविणे याकरिता द्विसदस्यीय समिती (अॅड रामदास सब्बन आणि प्राचार्य जे.के. बिले) अहवाल सादर करेल अशी दुरुस्ती केली.**

**४) पान क्र. ५ वर, तिसऱ्या ओळीतील "मनुष्यबळ नियोजन समितीचे" ऐवजी "संबंधित समितीचे" अशी दुरुस्ती केली.**

**५) पान क्र. ६ वर, ठराव क्र. ९ (अ) "पुढील वर्षी २० जून", अभियांत्रिकी, तांत्रिक, आर्किटेक्चर, फार्मसी यांच्याकरिता द्वितीय सत्र प्रारंभ "दि.१/१/२००८ आणि द्वितीय सत्र समाप्ती दि.२०/५/२००८" अशी दुरुस्ती केली आणि इ) प्रलंबित ठेवण्यात यावा असे ठरले.**

**६) पान क्र. ७ वर, ठराव क्र. १० मध्ये, प्रत्येक शैक्षणिक वर्षात शासनाकडे मागणी करावयाच्या ५ शैक्षणिक अधिविभागामध्ये ह्यावर्षी एम.पी.एड. प्रस्ताव अनुदानित तत्वावर शासनाकडे मागणी करावा तसेच जागा व सोयीसुविधा, क्रीडा मैदान,अनुषंगिक बाबी उपलब्ध झाल्यावर प्रस्ताव तयार करण्यात यावा अशी दुरुस्ती केली.**

दि.२२/८/०७ रोजीच्या कार्यवृत्तांतातील पहिल्या पानावरील परिच्छेद क्र. ४ व ५ वगळण्यात यावा असे ठरले.

**विषय क्र. २ - विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा. कुलगुरु यांनी सादर कारवयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**( सोबत अहवाल जोडला आहे.)**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव क्र. २ - पान क्र. ११ वर, प्रशासकीय विभागाच्या अहवालामधील परिच्छेद क्र. ४ मधील "प्रगतीपथावर" ऐवजी "चालू " अशी दुरुस्ती करण्यात यावी तसेच पुरवणी अहवालावर मा. सदस्यांनी तारीखवार विचारलेली सर्व माहिती व कागदपत्रे मा.अध्यक्षांनी वाचून दाखविली व त्याबाबत सदस्यांचे संपूर्ण समाधान केले तसेच CAS चा संपूर्ण अहवाल मागवून सादर केला त्याची नोंद घेतली.**

**विषय क्र. ३ - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पंधरा (१५) नैमित्तीक रजेबाबत..**

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या काळात पंधरा (१५) नैमित्तीक रजा देण्यात याव्यात अशी सोलापूर विद्यापीठ मागासवर्गीय अधिव्याख्याता व शिक्षकेतर कर्मचारी संघटना, सोलापूर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे परिपत्रक क्र.आस्था/आरओ/३५/२००५ दि.११/८/२००५ च्या आधारे मागणी केलेली आहे.

याबाबत महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठाकडून माहिती मागविण्यात आली असता एकूण ०९ विद्यापीठाने माहिती दिलेली आहे. त्याचा तक्ता सोबत जोडलेला आहे.

सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ३ - शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या नियमाप्रमाणेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रजा आठ (०८) आहे तशाच ठेवाव्यात असे ठरले.**

**विषय क्र. ४ - M.C.A विभागाकडील शिक्षकांची पदे ही UGC ने शिफारस केलेल्या वेतन श्रेणी प्रमाणे भरणे साठी धोरणात्मक निर्णय बाबत..**

(सोबत M.C.A. विभागा कडून प्राप्त झालेला प्रस्ताव जोडला आहे. तरी सदर विभागाची मागणी विचारार्थ.)

**ठराव क्र. ४ - सदर विभागाकडील शिक्षकांची पदे शासनाने मंजूर केल्यानंतरच UGC वेतनश्रेणीबाबत विचार करावा असे ठरले.**

**विषय क्र. ५ - तिसऱ्या दीक्षांत समारंभासाठी प्रमुख अतिथी ठरविण्याबाबत..**

टिपणी :- सोलापूर विद्यापीठाचा तिसरा दीक्षांत समारंभ नोव्हेंबर २००७ / डिसेंबर २००७ मध्ये घेण्याचे नियोजन आहे. या समारंभसाठी अतिथी ठरविण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ५ - तिसऱ्या दीक्षांत समारंभासाठी प्रमुख अतिथी ठरविण्याबाबत नियुक्त समितीकडे हा विषय पाठवावा तसेच डॉ. सुखदेव थोरात अध्यक्ष विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्या नावाचा विद्यापीठ हिताच्या दृष्टीने प्राधान्याने विचार करावा असे ठरले.**

**विषय क्र. ६ - कै. डॉ. दु. का. संत यांची ग्रंथसंपदा विद्यापीठ ग्रंथालयास देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत..**

( माननीय श्री. विकास व डॉ. उदयप्रकाश संत बंधू, कोल्हापूर यांच्या सोबतच्या पत्रान्वये त्यांच्या वडिलांचा ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगी म्हणून देण्याची त्यांची इच्छा असून सदरचा ग्रंथ संग्रह स्वतंत्र कै. डॉ. दु. का. संत ग्रंथसंग्रह म्हणून ग्रंथालयात ठेवावा तसेच हा ग्रंथसंग्रह विद्यापीठाने स्वखर्चाने आणावा अशी त्यांची इच्छा आहे. यास मा. कुलगुरु महोदय यांनी सहमती दर्शविली असून त्याबाबत त्यांना पत्र पाठविण्यात आले आहे.

सदरचा ग्रंथसंग्रह स्विकारणेबाबत महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा १९९४ कलम नं. २८ (h) प्रमाणे स्वीकारणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवून मान्यता घेण्याकरिता सविनय सादर.)

**ठराव क्र. ६ - ग्रंथालय समितीने नियुक्त केलेल्या उपसमितीसमोर हा विषय सादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. ७ - चेंजिस इन स्टाफच्या समितीने सादर केलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ..**

सोलापूर विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नीत महाविद्यालयाकडील शिक्षकांना चेजिंस इन स्टाफ मान्यता देण्यासाठी Ordiance 0.65 प्रमाणे गठीत केलेल्या समितीच्या बैठक दि. १७/०५/२००७ रोजी झाली. सदरच्या बैठकीमध्ये सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे चेंजिस इन स्टाफच्या मान्यतेच्या शिफारशी केलेल्या आहेत. सदरच्या शिफारशींना Ordiance 0.65 प्रमाणे व्यवस्थापन परिषदेची मान्यता आवश्यक आहे. सदरचा अहवाल व्यवस्थापन परिषदेसाठी विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ७ -** **चेंजिस इन स्टाफच्या समितीने सादर केलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेने मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. ८ -** **ॲडव्होकेट अशोक वळसंगकर, श्री. बी. व्ही. नेर्लेकर आणि श्री. द. प्र. नाईकनवरे यांची पं. प्रभुदेवजी सरदार यांचा मानद अशी पदवी देऊन यथोचित सत्कार आणि मानपत्र देवून गौरव करण्याबाबतची पत्रे व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ..**

टिपणी :- सोबत ॲडव्होकेट अशोक वळसंगकर, श्री. बी. व्ही. नेर्लेकर आणि श्री. द. प्र. नाईकनवरे यांची पत्रे सोबत जोडलेली आहेत.

ॲडव्होकेट अशोक वळसंगकर आणि श्री. बी. व्ही. नेर्लेकर यांनी त्यांच्या पत्रात पं. प्रभुदेवजी सरदार यांनी संगीत क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल मानद अशी पदवी सोलापूर विद्यापीठाने देऊन यथोचित सत्कार करावा अशी विनंती केलेली आहे.

श्री. द. प्र. नाईकनवरे यांनी त्यांच्या पत्रात पं. प्रभुदेवजी सरदार यांनी संगीत क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल मानपत्र देऊन विद्यापीठाने त्यांचा गौरव करावा अशी विनंती केलेली आहे.

सबब, ॲडव्होकेट अशोक वळसंगकर, श्री. बी. व्ही. नेर्लेकर आणि श्री. द. प्र. नाईकनवरे यांची पत्रे व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ८ -** **सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेसमोर येण्यापूर्वी विद्यापीठ कायद्यानुसार महामहिम कुलपती यांची परवानगी घेणे आवश्यक आहे व तसे प्रस्तावित नसल्याने अमान्य करण्यात यावा असे ठरले.**

**विषय क्र. ९ -** **ग्रंथालय समितीच्या सभेचे ठराव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

दि. ०६/०८/२००७ रोजी ग्रंथालय समितीची सभा झाली. या सभेमध्ये झालेले ठराव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा (xxxv) - 1994.75 C iii आणि iv अन्वये व्यवस्थापन परिशदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ९ -** **दि.६/८/०७ रोजी झालेल्या ग्रंथालय समितीच्या सभेच्या ठरावास मान्यता देण्यात आली तसेच ग्रंथालयाची अंदाजपत्रकीय तरतूद, अनुषंगिक माहिती इ. टॅब्युलर फॉर्ममध्ये द्यावी आणि यापुढे फी वाढ करताना समप्रमाणात वाढ करावी असे श्री. एन. बी. पवार यांनी सुचविले. पुढील वेळी ग्रंथालय अहवाल सोबत द्यावा असे सुचविणेत आले.**

**विषय क्र. १०-** **व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत दि. ०९/१०/२००६ विषय क्र. १५ दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा येथील डॉ. सुभाष कदम यांच्या पदाच्या नेमणुकीला दिलेली मान्यता काढून घेण्यासंदर्भात देण्यात यावयाच्या नोटीसीसंदर्भातील विषयाबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८(dd) नुसार, या विषयाचा सखोल अभ्यास व चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल विचारार्थ ..**

टिपणी :- व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत दि. ०९/१०/२००६ विषय क्र. १५ दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा येथील डॉ. सुभाष कदम यांच्या पदाच्या नेमणुकीला दिलेली मान्यता काढून घेण्यासंदर्भात देण्यात यावयाच्या नोटीसीसंदर्भातील विषयाबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४

मधील कलम २८(dd) नुसार, या विषयाचा सखोल अभ्यास व चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी खालील समिती नेमलेली होती.

१. ॲड. रामदास पी. सब्बन
२. प्राचार्य जे. के. बिले
३. प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर
४. डॉ. एल. पी. देशमुख
५. श्री. एन. बी. पवार
६. सौ. साठे एन. व्ही.
७. डॉ. आर. आर. पाटील - संचालक, म.वि.वि.मं

सदरच्या समितीने वेळोवेळी बैठका घेवून सोबत जोडलेला प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे. सदरचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. १० - चौकशी समितीने सादर केलेला अहवाल स्विकारण्यात आला. परंतु डॉ. सुभाष कदम यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देवून योग्य निर्णय घेणेबाबत विचार करण्याचे ठरले.**

**विषय क्र. ११- कॉपीयर मशीन (शॉर्प कंपनी) खरेदी संदर्भात केलेली कार्यवाही माहितीसाठी सादर.**

परीक्षा विभागाकडे सध्या एकच कॉपीयर मशीन असून विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार उत्तरपत्रिकाच्या झेरॉक्स प्रती विद्यार्थ्यांना वेळेत द्याव्यात लागत असल्याने परीक्षा विभागाने आणखी एक कॉपीयर मशीन खरेदी करुन मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. तसेच बी. सी. यु. डी. यांनी विभागास स्वतंत्रपणे कॉपीयर मशीन खरेदी करुन मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला होता. सदर खरेदीचा प्रस्ताव दि. ११ जून, २००७ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या व दि.१७/०७/२००७ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या सभेपुढे विचारार्थ ठेवला असता समितीने परीक्ष विभाग, प्रवेश विभाग व बी. सी. यु. डी. विभागास दरकरारानुसार कॉपीयर (Sharp Copier Machine Model No. AR-5320) रुपये ५१,०००/- (Taxes Extra) प्रती नग याप्रमाणे तीन नग खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार कॉपीयर मशीन्स खरेदी करण्यात आलेले आहे.

सबब, सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र. ११ - कॉपीयर मशीन (शॉर्प कंपनी) खरेदी संदर्भात केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. १२- इलेक्ट्रॉनिक पोस्टल फ्रँकिंग मशीन खरेदी संदर्भात केलेली कार्यवाही माहितीसाठी सादर.**

विद्यापीठाच्या विविध विभागाचा पत्र व्यवहार सुरळीत व नियमित निर्गमित होण्याकरिता टपालांची संख्या व लागणारा वेळ/मनुष्यबळ विचारात घेता जावक विभागासाठी इलेक्ट्रॉनिक पोस्टल फ्रँकिंग मशीन खरेदी करणे आवश्यक असल्याने सदर खरेदीचा प्रस्ताव दि. ११ जून, २००७ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या व दि.१७/०७/२००७ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या सभेपुढे विचारार्थ ठेवला असता समितीने जावक विभागास दरकरारानुसार Kiburn Office Automation Ltd. यांचेकडून Electronic Postal Franking Machine Model - E-211रुपये १,०६,५७६/-(Taxes Extra) खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. दरकरार दि. ३१ जुलै, २००७ रोजी संपणार असल्याने मशीन खरेदी करण्यात आली.

सबब, सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र. १२ - इलेक्ट्रॉनिक पोस्टल फ्रँकिंग मशीन खरेदी संदर्भात केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. १३- विद्यापीठ व पी. जी. डिपार्टमेंटसाठी विशेष कक्ष स्थायी समिती स्थापन करणेबाबत.**

टिपणी :- विद्यापीठ अनुदान आयोगा नवी दिल्ली यांच्या परिपत्रकानुसार केंद्र सरकार, यु. जी. सी. व राज्य सरकार यांचे मार्फत मागासवर्गीयांसाठी दिल्या जाणाऱ्या सवलती आदेश व योजना यांची परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने विद्यापीठात विद्यापीठ व पी. जी. डिपाटमेंटसाठी विशेष कक्ष स्थायी समिती स्थापन करावयाचे आहे.

मा.प्र. कुलगुरु यांच्या अध्यक्षेतखाली विद्यापीठातील

१) एक प्राध्यापक
२) एक प्रपाठक
३) एक अधिव्याख्याता
४) एक उप कुलसचिव
५) एक अधीक्षक
६) शिक्षक वर्गातील एक महिला सदस्या
१) शिक्षकेत्तर वर्गातील एक महिला सदस्या
२) स्पेशल सेल मधील एक उपकुलसचिव सदस्य / सेक्रेटरी
असे सदस्य असतील सध्या आपल्याकडे उपकुलसचिव पद कार्यरत नसल्याने कुलसचिव सदस्य / सेक्रेटरी हे असतील

तरी अनुक्रमे १ ते ७ मधील सदस्यांची विद्यापीठाचे मा. कुलगुरु यांनी नामनिर्देशीत करुन नेमणूक करावयाचे आहे. या नामनिर्देशीत सदस्यांची कालावधी ३ वर्षासाठी राहील

सदर वरील प्रमाणे स्थायी समिती गठीत करण्यात आलेली आहे. समिती व्यवस्थापन परिषदेच्या अवलोकनार्थ सोबत जोडलेली आहे सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. १३ - विद्यापीठ व पी. जी. डिपार्टमेंटसाठी प्रस्तावित विशेष कक्ष स्थायी समितीस मान्यता दिली.**

**विषय क्र. १४- डॉ. एम. जी. प्रधान यांनी त्यांच्या पत्नीच्या स्मृतिप्रित्यर्थ रु.५०,०००/- देणगी दिल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी.**

टिपणी : डॉ. एम. जी. प्रधान यांनी त्यांच्या पत्नी सौ. कुमूदिनी (स्वपरिचय पत्र सोबत जोडले आहे) यांच्या स्मृतिप्रित्यर्थ महाविद्यालयात नियमित शिक्षण घेणाऱ्या बी. ए. मध्ये इंग्रजी विषय घेऊन विद्यापीठ परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास गोल्ड मेडल देण्यासाठी रु.५०,०००/- इतकी देणगी विद्यापीठाकडे देणेची इच्छा त्यांचे पत्राद्वारे व्यक्त केली आणि सदर देणगी रु.५०,०००/- विद्यापीठास दि.५/९/०७ रोजी सुपूर्त केली. सदर रु.५०,०००/- चा चेक मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या स्वीकृतेच्या अधीन राहून स्वीकारला आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी व स्वीकृती देणेबद्दल.

**ठराव क्र. १४ - मा.कुलगुरु यांनी केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली व स्वीकृती दिली आणि डॉ. एम. जी. प्रधान यांना आभाराचे पत्र पाठविण्यात यावे असे ठरले.**

**विषय क्र. १५-** **कै. के. भोगिशयना फाऊंडेशन सोलापूर तर्फे एम. ए. इंग्रजीमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस पारितोषिक देण्याबाबत रु.५०,०००/- ची देणगी मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने स्वीकारल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी.**

टिपणी:- दि.२१/८/२००७ च्या पत्रान्वये मा. कै. के. भोगिशयना फाऊंडेशन सोलापूरने एम. ए. इंग्रजीमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास सुवर्ण पदक देण्याकरिता रु.५०,०००/- देणगी विद्यापीठाकडे सुपूर्त करणेची इच्छा व्यक्त केली. त्या पत्रावर मा.कुलगुरु डॉ. इरेश स्वामी सरांनी सदर पत्र व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवावे अशा सूचना दिल्या (सोबत पत्र आहे). तद्‌नंतर दि.५/९/०७ च्या कै. के. भोगिशयना यांचे तैलचित्र अनावरण प्रसंगी मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या स्वीकृतेच्या अधीन राहून रु.५०,०००/- देणगीचा चेक स्वीकारला.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी व स्वीकृती देणेबद्दल.

**ठराव क्र. १५ -** **मा.कुलगुरु यांनी केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली व स्वीकृती दिली आणि कै. के. भोगिशयना फाऊंडेशन सोलापूर यांना आभाराचे पत्र पाठविण्यात यावे असे ठरले.**

**विषय क्र. १६-** **भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगांव या महाविद्यालयाचे एम.सी.ए. हा अभ्यासक्रम जून २००७ पासून सुरू करण्याबाबतचे पत्र विचारार्थ..**

भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगांव या महाविद्यालयामध्ये जून २००७ पासून एम.सी.ए. हा अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देण्याबाबतची विनंती महाविद्यालयाचे अध्यक्ष यांनी केलेली आहे. (सदरचे दि. १०/७/२००७ व दि. ०१/८/२००७ रोजीचे पत्र सोबत जोडलेले आहे.)

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ मध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याची कार्यपध्दती नमूद केलेली आहे. महाविद्यालयाने संलग्निकरण फी रू. १०,०००/- सह प्रस्ताव सादर केला होता. परंतु तो वेळेत नसलेने नंतर विद्यापीठाने सदर प्रस्ताव विद्यापीठ पत्र क्र.सोविसो/युटीवाय/ॲफी/९४१/२३९१ दि. ४/९/२००७ अन्वये फी सहीत परत पाठविला होता.

सदरची बाब महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या विचारार्थ ठेवली असता समितीने ए.आय.सी.टी.ई व डी.टी.ई. ची मान्यता असल्यामुळे आणि संचालक, तंत्र शिक्षण विभाग, यांनी महाराष्ट्र शासनाचे वतीने केंद्रीय प्रवेश पध्दतीने दिलेले असलेने मान्यता द्यावी असे ठरले. असा ठराव केलेला आहे. त्यामुळे संबंधित महाविद्यालयाकडून एम.सी.ए. या अभ्यासक्रमाचा जुना प्रस्ताव नियमाप्रमाणे फी स्वीकारुन पूर्वलक्षीप्रभावाने शासनाने प्रवेश दिल्याने मान्य करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी..

**ठराव क्र. १६ -** **भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगांव या महाविद्यालयास एम.सी.ए. हा अभ्यासक्रम जून २००७ पासून नियमाप्रमाणे फी आकारुन सुरू करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता द्यावी असे ठरले. महाराष्ट्र शासनाने त्यांचे पातळीवर निर्णय घेतल्याने विद्यापीठास होणाऱ्या अडचणीबाबत विद्यापीठाचे म्हणणे शासनास पत्राने कळवावे असे ठरले.**

**विषय क्र. १७-** **कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी या महाविद्यालयास एम.पी.एड. या नवीन अभ्यासक्रमास महाराष्ट्र शासनाने परवानगी दिल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी..**

कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाने पत्र क्र.शाशिम-२००५/प्र.क्र.२३०/क्रियुसे-२, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दि. १८ सष्टेंबर २००७ अन्वये एम.पी.एड. हा नवीन अभ्यासक्रमास कायमस्वरूपी विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेली आहे. सदरची बाब महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या माहितीसाठी ठेवली असता महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समिती यांनी महाराष्ट्र शासनाची मान्यतेची नोंद घेतली. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ८२ (५) मध्ये नमूद केल्या प्रमाणे सदरच्या महाविद्यालयास १५ जुलै नंतर परवानगी दिली असल्याने पुढील शैक्षणिक वर्षापासून परवानगी द्यावी असे ठरले. व विद्यार्थ्यांना प्रवेश हा शासनाने नियुक्त केलेल्या समितीमार्फेत करावेत. व जाहिरात मंजूर करुन घेवून त्याप्रमाणे जाहिरात द्यावी. असा ठराव केलेला आहे सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी..

**ठराव क्र. १७ -** **एन.सी.टी.ई. चे दि.१७ डिसेंबर २००६ आणि शालेय शिक्षण क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई यांचे दि.१८ सप्टेंबर, २००७ च्या पत्रास अनुसरुन १८० दिवस भरण्याच्या अटीस अधीन राहून कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी या महाविद्यालयास एम.पी.एड. या नवीन अभ्यासक्रमास मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. १८-** **सांगोला महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाच्या जून २००४ पासून बी.सी.ए.भाग २ च्या विस्तारास व जून २००५ बी.सी.ए. भाग ३ च्या विस्ताराच्या मान्यतेबाबत..**

सांगोला महाविद्यालयाचे जून २००४ पासून बी.सी.ए.भाग २ व जून २००५ पासून बी.सी.ए.भाग ३ च्या विस्ताराचे प्रस्ताव सोलापूर विद्यापीठाकडे सादर न करता दि. ३० ऑगस्ट २००४ रोजी सदरचे प्रस्ताव व शुल्क शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे सादर केल्याचे संबंधित कागदपत्रावरून दिसते. सदरचे प्रस्ताव विद्यापीठ नियमाप्रमाणे सोलापूर विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक होते.

त्याचप्रमाणे उपरोक्त अभ्यासक्रमाच्या विस्तारास शासनाची मान्यता आवश्यक असते. आपल्या महाविद्यालाच्या बी.सी.ए.भाग २ व ३ या अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्तारास अद्याप शासनाची मान्यता नाही. शिवाजी विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ८ अन्वये Ordinances १३० (i) प्रमाणे सदरच्या प्रस्ताव विद्यापीठाकडे प्राप्त होईपर्यंत शुल्क व रू.१०००/- प्रमाणे प्रतिमहिना दंड भरण्याबाबत महाविद्यालयास कळविलेले होते. महाविद्यालयाने पत्र क्र.१७७ दि. ६ जुलै २००७ च्या पत्राची प्रत सोबत पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

सदरची बाब महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या विचारार्थ ठेवले असता समितीने महाविद्यालयाकडून नियमित शुल्क घेवून सदरचा प्रस्ताव पूर्वलक्षीप्रभावाने शासनाकडे पाठविण्यासा मान्यता देण्यात आली. कारण सदरच्या वेळेचा संक्रमण कालावधी असल्यामुळे सदरचे प्रस्ताव महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठाकडे पाठवून दिलेले होते. व शिवाजी विद्यापीठाने सदरच्या प्रस्तावावरती कार्यवाही न करता ते नवनिर्मित सोलापूर विद्यापीठाकडे वर्ग केलेले आहेत. त्यामुळे महाविद्यालयास दंडाची तरतूद लागु होत नाही .

त्यामुळे सदरचे प्रस्ताव वरील ठरावानुसार शासनकडे पाठवावेत अशी शिफारस केलेली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी..

**ठराव क्र. १८ -** **सांगोला महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाच्या जून २००४ पासून बी.सी.ए.भाग २ च्या विस्तारास व जून २००५ बी.सी.ए. भाग ३ च्या विस्तारास व्यवस्थापन परिषदेने मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. १९-** **जून २००७ पासून शासनाने नवीन महाविद्यालय, विषय, तुकडी, विद्याशाखा, यांना परवानगी दिल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी. (सोबत यादी जोडली आहे.)**

जून २००७ पासून सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे सोलापूर विद्यापीठ संलग्नित नवीन महाविद्यालय, विषय, तुकडी वाढ व विद्याशाखा यांना महाराष्ट्र शासनाने परवानगी दिलेली आहे. सदरच्या महाविद्यालयांना संलग्निकरणाची मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी..

**ठराव क्र. १९ -** **जून २००७ पासून शासनाने नवीन महाविद्यालय, विषय, तुकडी, विद्याशाखा, यांना परवानगी दिल्याच्या बाबीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. २०-** **प्राचार्य बबनरावजी शिंदे महाविद्यालय, कुर्डूवाडी या महाविद्यालयाचे पत्र क्र.केबीएसएमके/०६/२००७-०८ दि. २८/६/२००७ रोजीचे पत्र विचारार्थ...**

सदरच्या महाविद्यालयास नैसर्गिक वाढी बी.एस्सी भाग-3 करिता खालील विषयांची मागणी केलेली होती.
इंग्रजी (आवश्यक)
ऐच्छिक
रसायनशास्त्र, गणित, सुक्ष्मजीवशास्त्र, प्राणीशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र या विषयाची मागणी केलेली होती. तथापि त्यांना रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र या दोन विषयांची शिफारस केलेली आहे. सदरच्या महाविद्यालयाने रसायनशास्त्र विषयाऐवजी **सुक्ष्मजीवशास्त्र** या विषयांना मान्यता देण्याची मागणी केलेली आहे. सदरची बाब महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या विचारार्थ् ठेवले असता समितीने महाविद्यालयाची विनंती लक्षात घेवून सुक्ष्मजीवशास्त्र या विषयाची नैसर्गिक वाढीची विनंती मान्य करण्यात आली. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी..

**ठराव क्र. २० -** **टिपणीमध्ये "भौतिकशास्त्र" ऐवजी "सूक्ष्मजीवशास्त्र" अशी दुरुस्ती करुन प्राचार्य बबनरावजी शिंदे महाविद्यालय, कुर्डूवाडी यांनी त्यांच्या पत्रानुसार केलेली विनंती मान्य करावी असे ठरले.**

**विषय क्र. २१-** **शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज या संस्थेस महाराष्ट्र शासनाने नवीन बी.सी.एस. महाविद्यालयास परवानगी दिल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी..**

शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज या संस्थेस महाराष्ट्र शासनाने दि. १४ ऑक्टोबर २००७ रोजीच्या अन्वये नवीन बी.सी.एस. या महाविद्यालयास मान्यता दिलेली आहे. सदरच्या संस्थेचा प्रस्ताव विद्यापीठाने सदरची बाब महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या माहितीसाठी ठेवला असता सदरच्या समितीने महाराष्ट्र शासनाची मान्यतेची नोंद घेतली. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ८२ (५) मध्ये नमूद केल्या प्रमाणे सदरच्या महाविद्यालयास १५ जुलै नंतर परवानगी दिली असल्याने व विद्यापीठ नियमाप्रमाणे सदरचा अभ्यासक्रमाची परिक्षा ही सेमिस्टर पध्दतीने होत असल्याने अध्यपनाचे दिवस पूर्ण होत नसल्याने पुढील शैक्षणिक वर्षापासून परवानगी द्यावी असा ठराव केलेला आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी..

**ठराव क्र. २१ -** **टिपणीतील "सेमिस्टर पध्दतीने" हे शब्द वगळून पुढील वर्षापासून शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज या संस्थेस नवीन बी.सी.एस. महाविद्यालयास परवानगी द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. २२-** **जयजगदंबा बहुददेशिय संस्था, सर्जापूर यांच्या एम.एड. या अभ्यासक्रमांच्या मान्यतेबाबत महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.एमएड/२००७/(१६२/०७)मशि-१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे दि. २३ मे २००७ रोजीचे पत्र विचारार्थ..**

सदरच्या संस्थेने विद्यापीठाकडे दि. ३१/१०/२००५ रोजी एम.एड. हा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला होता. बी.सी.यु.डी. व व्यवस्थापन परिषदेने सदरचा प्रस्ताव नामंजूर केलेला होता. तथापि महाराष्ट्र शासनाने उपरोक्त पत्रान्वये त्यांना एम.एड. हा अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी देवून विद्यापीठाने संलग्निकरणाबाबत पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिलेल आहेत. सदरची बाब महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या विचारार्थ् ठेवला असता समितीने

१.शासनाच्या आदेशाप्रमाणे संलग्नतेची कार्यवाही करुन याबाबतचा कार्यवाहीचा अहवाल शासनास पाठवावा. सत्र समाप्ती पर्यंत १८० दिवस भरण्याच्या अटीवर मान्यता द्यावी.

२. महाराष्ट्र शासनास खालील बाबी निर्दशनास आणून द्याव्यात.

अ. सोलापूर विद्यापीठाचा शैक्षणिक गरजा व सुविधाचा विचार करुन बृहत आराखडा तयार केलेला आहे. सदरचा आराखडा शासनाकडे पाठविलेला आहे. बृहत आराखडया व्यतिरिक्त अन्य ठिकाणचे प्रस्ताव स्विकारु नयेत असे व शिफारस करु नयेत असे महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.बैठक २००६/(५२७/०६)मशि-३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई दि. २९ डिसेंबर २००६ रोजीचे पत्रान्वये आदेश दिलेले आहेत.

परंतु महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ मधील **Provided, however, that in exceptional cases and for the reasons to be recorded in writing any application not recommeded by the university may be approved by the State Government for Starting a new college or institution of higher learning अन्वये शासनास सर्व अधिकार आहेत.**

या कलमाची नोंद घेतली.

ब. कायदयात सुधारणा करण्याबाबत शासनास पत्र लिहणे

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी..

**ठराव क्र. २२ -** **जयजगदंबा बहुद्देशिय संस्था, सर्जापूर यांना एम.एड. या अभ्यासक्रमास महाराष्ट्र शासनाने दिलेल्या मान्यतेची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेऊन मान्यता दिली. शासनाने त्यांचे अधिकारात मान्यता दिलेनंतर विद्यापीठास होणाऱ्या अडचणीबाबत शासनास कळवावे असे ठरले.**

**विषय क्र. २३-** **बी.पी.सुलाखे कॉलेज ऑफ कॉमर्स, बार्शी या महाविद्यालयाचा जून २००४ पासून बी.सी.ए.भाग २ व जून २००५ पासून बी.सी.ए.भाग ३ या अभ्यासक्रमाच्या विस्ताराचा प्रस्ताव शासनास शिफारस करण्याची बाब समितीच्या विचारार्थ..**

सोबत बी.पी.सुलाखे कॉलेज ऑफ कॉमर्स, बार्शी या महाविद्यालयाचा बी.सी.ए. विस्ताराचा प्रस्ताव विचारार्थ्. सदरच्या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाने जून २००३-०४ पासून मान्यता दिलेली आहे. तथापि शिवाजी विद्यापीठाने पत्र

क्र.शिवाजीवि/संलग्नता टी २ /पीबीवाय/७७१७ दि. १६ डिसेंबर २००२ नुसार शैक्षणिक वर्ष समाप्त होत आलेले आहे. शासनाची मान्यता फारच उशिरा आलेली आहे. त्यामुळे आपणास सदर अभ्यासक्रम बी.सी.ए. हा सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याबाबत कळविलेले आहे. सदरचे महाविद्यालय जून २००३ पासून सुरू झालेले आहे. सदरच्या महाविद्यालयाने महाराष्ट् विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८६ व ८७ अन्वये जून २००४ पासून बी.सी.ए. भाग २ करिता नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव विद्यापीठाकडे ऑगस्ट २००३ मध्ये विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक होते.

तसेच जून २००५ पासून बी.सी.ए.भाग ३ करिता नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव महाविद्यालयाने ऑगस्ट २००४ पर्यंत विद्यापीठाकड सादर करणे अत्यंत आवश्यक होते. सदरच्या महाविद्यालयाने अद्यापही नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर केलेले नाहीत.

सदरच्या महाविद्यालयास जून २००४ पासून बी.सी.ए. भाग २ व जून २००५ पासून बी.सी.ए.भाग ३ करिता शासनाची मान्यता नाही. सदरची बाब महाराष्ट् विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२,८३,८४,८६,८७ या कायदयाचे उल्लघंन करणारी आहे.

तसेच Status ३४७ (१) नुसार अशा प्रकारचे प्रस्ताव उशिरा प्राप्त झाल्यास महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या विचारार्थ ठेवण्याची कायदयामध्ये तरतूद आहे.

तसेच Ordinance १३०(i) नुसार प्रस्ताव प्राप्त होईपर्यंत शुल्क व्यतिरिक्त प्रत्येक महिन्याला रू. १०००/- इतका दंड आकरण्याचीही कायदयामध्ये तरतूद आहे. सदर महाविद्यालयाचे बी.सी.ए.भाग २ व बी.सी.ए. भाग ३ चे प्रस्ताव विद्यापीठाकडे दि. १८/८/२००७ रोजी सादर केलेले आहेत. सदरचे प्रस्ताव महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या विचारर्थ ठेवले असता समितीने Ordinance १३०(i) नुसार प्रस्ताव प्राप्त होईपर्यंत शुल्क व्यतिरिक्त प्रत्येक महिन्याला रू. १०००/- इतका दंड आकारून प्रस्ताव पूर्वलक्षीप्रभावाने मान्यता द्यावी. असा ठराव केलेला आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी..

**ठराव क्र. २३ - बी.पी.सुलाखे कॉलेज ऑफ कॉमर्स, बार्शी या महाविद्यालयाकडून जून २००४ पासून बी.सी.ए. भाग २ व जून २००५ पासून बी.सी.ए. भाग ३ या अभ्यासक्रमाच्या विस्ताराचा विद्यापीठाकडे प्राप्त झालेला नाही. त्यामुळे Ordinance १३० (i) नुसार हा प्रस्ताव प्राप्त होईपर्यंत शुल्क व्यतिरिक्त प्रत्येक महिन्याला रु.१०००/- इतका दंड आकारुन प्रस्ताव पूर्वलक्षीप्रभावाने मान्य करावा असे ठरले.**

**विषय क्र. २४- श्रीराम शिक्षण संस्था, पानीव या संस्थेस महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.एनजीसी २००७/(२४७/०७)/मशि-३ दि. १४ सप्टेंबर २००७ अन्वये मान्यता दिलेल्याची बाब माहितीसाठी...**

सोलापूर विद्यापीठाकडे जून २००७ पासून बी.सी.ए., बी.सी.एस., एम.एस्सी.कॉम्प्युटर सायन्स हे नवीन महाविद्यालय सुरू करण्याकरिता श्रीराम शिक्षण संस्था, पानीव या संस्थेने सोलापूर विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केलेले होते. सदरच्या प्रस्तावाकरिता महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२(४) अन्वये महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीने दि. १५/१/२००७ व व्यवस्थापन परिषदेने शिफारस केलेली नव्हती.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२(५) अन्वये शासनाने प्राप्त अधिकारात अकलूज या ठिकाणी बी.सी.ए. व बी.सी.एस., व पानीव या ठिकाणी एम.एस्सी.कॉम्प्युटर सायन्स या नवीन महाविद्यालयास शै. वर्षे २००७-०८ पासून

परवानगी दिलेली आहे. सदरची बाब महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या माहितीसाठी ठेवण्यात आलेली होती सदरच्या समितीने महाराष्ट्र शासनाची मान्यतेची नोंद घेतली. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ८२ (५) मध्ये नमूद केल्या प्रमाणे सदरच्या महाविद्यालयास १५ जुलै नंतर परवानगी दिली असल्याने व विद्यापीठ नियमाप्रमाणे सदरचा अभ्यासक्रमाची परिक्षा ही सेमिस्टर पध्दतीने होत असल्याने अध्यपनाचे दिवस पूर्ण होत नसल्याने पुढील शैक्षणिक वर्षापासून परवानगी द्यावी असा ठराव केलेला आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी..

**ठराव क्र. २४ - श्रीराम शिक्षण संस्था, पानीव या संस्थेस म.वि.का. ९४ मधील कलम ८२ (५) मध्ये नमूद केल्याप्रमाणे १५ जुलै नंतर शासनाने परवानगी दिल्याने व विद्यापीठ नियमाप्रमाणे सदरच्या अभ्यासक्रमाची परीक्षा ही सेमिस्टर पध्दतीने होत असल्याने अध्यापनाचे दिवस पूर्ण होत नसल्याने पुढील शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्यास मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. २५- जयजगदंबा बहुददेशिय संस्था, सर्जापूर यांच्या बी.ए.बी.एड. या अभ्यासक्रमाच्या मान्यतेबाबत महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रएमएड/२००७/(१९३/०७)मशि-१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे दि. ११ जून २००७ रोजीचे पत्र विचारार्थ..**

सदरच्या प्रस्तावास महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ व व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरू यांची शिफारस नव्हती. सदरच्या शिफारशीची व्यवस्थापन परिषदेने दि. २७/१२/२००५ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.४७ अन्वये नोंद घेतलेली आहे.

सदरच्या महाविद्यालयास बी.ए. बी.एड., हा अभ्यासक्रम सुरू करण्याची शासनाने उपरोक्त पत्रान्वये परवानगी दिलेली आहे. सदरची बाब महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या विचारार्थ ठेवली असता समितीने शासनाच्या आदेशाप्रमाणे संलग्नतेची कार्यवाही करुन याबाबतचा कार्यवाहीचा अहवाल शासनास पाठवावा. सत्र समाप्ती पर्यंत १८० दिवस भरण्याच्या अटीवर मान्यता द्यावी.

तसेच महाराष्ट्र शासनास खालील बाबी निर्दशनास आणून द्याव्यात से ठरले.

अ . सोलापूर विद्यापीठाचा शैक्षणिक गरजा व सुविधाचा विचार करुन बृहत आराखडा तयार केलेला आहे. सदरचा आराखडा शासनाकडे पाठविलेला आहे. बृहत आराखडया व्यतिरिक्त अन्य ठिकाणचे प्रस्ताव स्विकारु नयेत असे व शिफारस करु नयेत असे महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.बैठक २००६/(५२७/०६)मशि-३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई दि. २९ डिसेंबर २००६ रोजीचे पत्रान्वये आदेश दिलेले आहेत.

परंतु महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ मधील **Provided, however, that in exceptional cases and for the reasons to be recorded in writing any application not recommeded by the university may be approved by the State Government for Starting a new college or institution of higher learning नुसास शासनास सर्व अधिकार आहेत.**

ब. कायदयात सुधारणा करण्याबाबत शासनास पत्र लिहावे असे ठराव केलेला आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी..

**ठराव क्र. २५ -** **टिपणीमध्ये "दि.२७/१२/०७" ऐवजी "दि.२७/१२/०५" अशी दुरुस्ती करुन शासनाने सन २००७-०८ करिता परवानगी दिलेली असली तरी या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे १८० दिवस भरत नसल्याने रीतसर संलग्नता फीसह प्रस्ताव सादर करुन घेऊन शैक्षणिक वर्ष २००८-०९ करिता मान्यता द्यावी असे ठरले.**

**Item No. 26** **Lokmangal Biotechnology College, Wadala was admitted more students than the permitted strength in Biotechnology Course, which has violated rules of admission. Hence, the issue is before the Management Council for consideration.**

Lokmangal Biotechnology College, Wadala has admitted more students than the permitted strength in Biotechnology Course, which has violated rules of admission. As per the report submitted by the committee appointed to consider the matter of excess students, the committee revived Maharashtra University Act 1994 ordinaces framed under Sec. 53 of the Act (**1998**) Ordiance O.44 (iii), a fine not less than the amount of annual tuition fees & not more than ten times the annual tuition fees per student, for the students admitted in excess of the permitted strength for course/division or for admitting students in violation of the rule of admission.

Thus, the committee has recommended a fine not less than the amount of annual tuition fee @ Rs. 20000/- per student up to the 7 (Seven) students admitted in excess of the permitted strength for the above course & to regularize the above excess admissions of B.Sc. Part-I Biotechnology Course.

The recommendation of the committee is kept before the Management Council for approval.

**Resolution No. 26** **It was resolved to accept the recommendations of the committee and excess students be permitted by charging a fine as above.**

**विषय क्र. २७-** **मल्टीक्लास रुम कॉम्पलेक्स इमारत बांधकामाबाबत..**

टिपणी :- आजपर्यंत या इमारतीच्या बांधकामासाठी १.११ कोटी रुपये खर्च झाला असून त्यापैकी ४० लाख रुपये सोलापूर महानगरपलिकेने विद्यापीठास दिलेले आहेत. उर्वरित रक्कम विद्यापीठ फंडामधून खर्च झालेली आहे. ३० लाखास व्यवस्थापन परिषदेच्या दि. २७/१२/२००५ ठराव क्र.६६ अन्वये मंजूरी दिलेली आहे. उर्वरित रकमेस सोलापूर महानगरपालिकेकडून निधी उपलब्ध होईपर्यंत विद्यापीठ फंडातून खर्च करण्यास व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीसाठी व शिफारशीसाठी सादर.

**ठराव क्र. २७ -** **बांधकाम समितीकडून मान्यता मिळाल्यानंतर हा विषय संपूर्ण तपशीलासह फेरसादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. २८-** **वास्तुविशारद व स्ट्रक्चरल डिझायनर्स यांची देयके अदा करण्याबाबत..**

विद्यापीठाच्या आवारात मुलांचे व मुलींचे वसतीगृह, कला व भाषा इमारत, मल्टीक्लासरुम कॉम्पलेक्स इमारतीची बांधकामे सुरु आहेत या बांधकामासाठी वास्तु विशारद म्हणून श्री. यादगिरी कोंडा व स्ट्रक्चरल डिझायनर्स म्हणून श्री. एस. पी. मोहोळकर व श्री. प्रणेश वैद्य यांची नियुक्ती विद्यापीठाच्या बांधकाम समितीने केलेली आहे. कला व भाषा इमारतीच्या बांधकामासाठी स्ट्रक्चरल डिझायनर म्हणून श्री. एस. पी. मोहोळकर, मुलांचे व मुलींचे वसतीगृह इमारतीचे स्ट्रक्चरल डिझायनर म्हणून श्री. प्रणेश वैद्य हे काम पाहतात. त्यांनी स्टेपवाईज झालेल्या कामाचे पेमेंट मिळावे म्हणून कार्यालयास देयके दिलेली आहेत आजतागायत त्यांना या कामापोटी कांहीच पेमेंट दिलेले नसल्याने त्यांचे पेमेंट बांधकामाच्या स्टेपवाईज अदा करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीसाठी व शिफारशीसाठी सादर.

**ठराव क्र. २८ - वास्तुविशारद व स्ट्रक्चरल डिझायनर्स यांची देयके अदा करण्याबाबतचा विषय संपूर्ण तपशीलासह फेरसादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. २९- प्राचार्य कै. के. भोगिशयना यांचे तैलचित्र विद्यापीठाच्या ग्रंथालयात अनावरण केल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर..**

**(सोबत पत्र जोडले आहे.)**

(टिपणी :- प्राचार्य कै. के. भोगिशयना यांचे माजी विद्यार्थ्यांचे दिनांक २१/०८/२००७ रोजीचे पत्र मा. कुलगुरु यांना प्राप्त झाले.

प्राचार्य कै. के. भोगिशयना हे संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर येथे प्राचार्य म्हणून कार्यरत होते तसेच त्यांची शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील कुलगुरु पदाची कारकीर्द मोलाची ठरलेली आहे. आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण क्षेत्रात खर्च केलेल्या शिक्षण तज्ञाचे स्मरण विद्यार्थ्यांना व्हावे अशी इच्छा संगमेश्वर महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी व निकटवर्ती मित्रांनी व्यक्त केली.

नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक होणार नसल्याने प्राचार्य कै. के. भोगिशयना यांचे तैलचित्र अनावरण करण्याचा कार्यक्रम मा. कुलगुरु यांनी शिक्षक दिनाचे औचित्य साधून दिनांक ५ सप्टेंबर, २००७ रोजी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने घेतला.

मा. कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.)

**ठराव क्र. २९ - प्राचार्य कै. के. भोगिशयना यांचे तैलचित्र विद्यापीठाच्या ग्रंथालयात अनावरण केल्याच्या कार्यक्रमाची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली आणि यापुढे अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे (तैलचित्र अनावरण, पुतळे, फोटो अनावरण इ.) आयोजन करण्यापूर्वी व्यवस्थापन परिषदेकडून मान्यता घ्यावी असे ठरले.**

**विषय क्र. ३०- सोलापूर विद्यापीठ परिसरामध्ये कॅन्टीन सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर..**

(टिपणी :- सोलापूर विद्यापीठ सुरु झाल्यापासून विद्यापीठ परिसरामध्ये शिक्षक, विद्यार्थी. पालक, कर्मचारी यांच्या अल्पोपहार, चहापान इत्यादी ची व्यवस्था नाही. शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी, पालक इ. यांना चहापानासाठी सोलापूर - पुणे हायवे ओलांडून बाहेर जावे लागते. विद्यापीठ परिसरामध्ये अल्पोपहार आणि चहापान याची व्यवस्था होण्याच्या दृष्टीने कॅन्टीन असावे असे विद्यापीठ प्रशासनास वाटते त्यासाठी कॅन्टीन सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.)

**ठराव क्र.३० - सोलापूर विद्यापीठ परिसरामध्ये कॅन्टीन सुरु करण्यास व्यवस्थापन परिषदेने तत्वत: मान्यता दिली तसेच परिसरामध्ये येणाऱ्या अभ्यागत आणि विद्यार्थी यांच्या सोयीकरिता दोन पी.सी.ओ. बसविण्यासही मान्यता द्यावी असे ठरले.**

<u>आयत्या वेळेचे विषय :-</u>

**विषय क्र. ३१- महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे बीएड२००७/(१५९/०७)मशि-१ दि. ३ सप्टेंबर २००७ रोजीचे पत्र माहितीसाठी.**

(टिपणी :- श्री. स्वामी विज्ञानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बळीरामदादा बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चळे या महाविद्यालयाने जून २००७ पासून शिक्षणशास्त्र महाविद्यालय सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला होता. सदरचा प्रस्ताव महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समिती व व्यवस्थापन परिषद यांनी

नाकारलेला होता. महाराष्ट्र शासनाने व एन. सी. टी. ई. भोपाल यांनी परवानगी दिल्यानंतर विद्यापीठाने संलग्निकरण देणे आवश्यक आहे व संलग्निकरण देण्याबाबत विद्यापीठाने तात्काळ कार्यवाही करुन अहवाल शासनास पाठविण्याबाबत उपरोक्त पत्रान्वये आदेश झालेले होते.

सदरचा विषय महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीसमोर ठेवला असता समितीने महाराष्ट्र शासनाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही सुरु करण्याचा ठराव केलेला आहे.

सदरच्या महाविद्यालयाच्या संलग्निकरणाकरिता प्रा. व्ही. तिरुपती, प्राचार्य एच. एन. जगताप व प्राचार्य एस. के. वाघ यांची स्थानिक चौकशी नियुक्त केलेली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी.)

**ठराव क्र.३१ - महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे बीएड२००७/(१५९/०७)मशि-१ दि. ३ सप्टेंबर २००७ रोजीच्या पत्राची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेऊन बळीरामदादा बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चळे यास जून २००७ पासून मान्यता द्यावी असे ठरले. तसेच नियुक्त केलेल्या स्थानिक चौकशी समितीची नोंद घेतली.**

**विषय क्र. ३२- सोलापूर विद्यापीठ व सी-डॅक यांच्यावतीने अल्प मुदतीचे संगणक अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ..**

(टिपणी :-विद्यापरिषदेच्या दि. २३/०१/२००६ च्या ठराव क्र. १० नुसार झालेल्या बैठकीत सोलापूर विद्यापीठ व सी-डॅक यांच्या संयुक्त विद्यमाने काही अल्प मुदतीचे संगणक अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन घेता इतर संस्थांच्या बरोबर असे कोर्सेस घेता येतील का इत्यादी बाबत अभ्यास करण्यासाठी खालील सदस्यांची समिती नियुक्ती करण्यात आली होती.

१. प्राचार्य बी. पी. रोंगे (अध्यक्ष)
२. श्री. एम. पी. साळुंखे
३. श्री. एस. के. मठपती
४. श्री. दिपकराव साळूंखे
५. डॉ. पी. बी. जोशी
६. प्राचार्य डॉ. ए. एल. देशमुख

सदर समितीने सी-डॅकच्या प्रस्तावाचा अभ्यास करुन पुन्हा नव्याने काही शिफारशी विद्यापरिषदसाठी तयार केल्या आहेत सदर शिफारशी दि. ०५/०६/२००७ व दि. १३/०६/२००७ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या ठराव क्र. ३१ नुसार मान्य करण्यात आलेला आहे. तरी सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.३२ - सोलापूर विद्यापीठ व सी-डॅक यांच्यावतीने अल्प मुदतीचे संगणक अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत नियुक्त समितीच्या शिफारशींना मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. ३३- प्राचार्य के.एन.भिसे कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुर्डूवाडी यांचे पत्र क्र. केएनबीएसीसीके ३४८३ दि. २९/०९/२००७ रोजीचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ..**

के.एन. भिसे कला व वाणिज्य महाविद्यालय, कुर्डूवाडी या महाविद्यालयामध्ये जून २००४ पासून नवीन विज्ञान या विद्याशाखेस शासनाने मंजूरी दिलेली होती व विद्यापीठाने बी.एस्सी. भाग - १ या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २००४-०५ व २००५-०६ या वर्षाकरिता संलग्निकरणाची मान्यता दिलेली होती.

सदरच्या महाविद्यालयामध्ये जून २००५ पासून बी.एस्सी. भाग २ व जून २००६ पासून बी.एस्सी. भाग ३ हे अभ्यासक्रम नैसर्गिक वाढीने सुरु झालेले होते. सदरच्या

अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक वाढीचे प्रस्ताव विद्यापीठाकडे विहीत कालवधीत विद्यापीठाकडे सादर केलेले नव्हते. सबब सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.१२/०२/२००७ रोजीच्या बैठकीत ठेवला असता व्यवस्थापन परिषदेने शिवाजी विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ८ प्रमाणे Ameded Ord No.१३० प्रमाणे सदरचे प्रस्ताव प्राप्त होईपर्यंत प्रत्येक महिन्याला रु. १०००/- या प्रमाणे दंड भरण्याच्या अटीवर व्यवस्थापन परिषदेने शिफारस केलेली होती.

सदरच्या ठरावाप्रमाणे महाविद्यालयास विद्यापीठाने पत्र क्र. सोविसो/युटीवाय/ॲफी/१४७/५४७ दि. १५ मे, २००७ रोजीच्या पत्रान्वये सदरच्या दंडाची रक्कम रु. ६३०००/- इतकी विद्यापीठाकडे जमा करण्याबाबत महाविद्यालयास कळविलेले होते.

महाविद्यालयाने उपरोक्त पत्रान्वये सदरचा दंड माफ करुन रेग्युलर फी आकारणी करण्याबाबतची विनंती केलेली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.३३ - के. एन. भिसे कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुर्डूवाडी यांनी त्यांच्या पत्रान्वये केलेली विनंती व्यवस्थापन परिषदेने अमान्य करावी असे ठरले.**

**विषय क्र. ३४- बी.एड., एम.एड. व एम.ए.(हिंदी) या परीक्षेत प्रथम येणाऱ्या परिक्षार्थीला रु.१०००/- पारितोषिक देण्याबाबत डॉ. ए. बी. गायकवाड यांनी रु.५१,०००/- देणगी दिल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी..**

टिपणी :- डॉ. ए. बी. गायकवाड यांनी रु.५१,०००/- देणगी विद्यापीठास दिनांक २०/०६/२००७ रोजी दिली आहे. यातून मिळणाऱ्या व्याजातून येणाऱ्या रकमेतून

१) दरवर्षी एम.एड. परीक्षेत प्रथम येणाऱ्या परिक्षार्थीला रु.१०००/- व लोगो या पारितोषिकाचे नाव - श्रीमती प्रमिलाबाई गायकवाड पारितोषिक.

२) बी.एड. परीक्षेत प्रथम येणाऱ्या परिक्षार्थीला रु.१०००/- व लोगो या पारितोषिकाचे नाव - कर्नल सिंधू गायकवाड पारितोषिक.

३) हिंदी विषयात एम. ए. ला प्रथम येणाऱ्या परिक्षार्थीला रु.१०००/- व लोगो या पारितोषिकाचे नाव - सौ. सविता गायकवाड पारितोषिक.

सदची पारितोषिके सन २००६-०७ या वर्षात झालेल्या परिक्षेतील उत्तीर्ण परिक्षार्थींना देवून सुरुवात करावी अशी विनंती केली आहे.

सबब, मा. कुलगुरु यांनी स्वीकारलेली रु.५१,०००/- देणगी व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र.३४ - बी.एड., एम.एड. व एम.ए.(हिंदी) या परीक्षेत प्रथम येणाऱ्या परिक्षार्थीला प्रत्येकी रु.१०००/- पारितोषिक देण्याबाबत डॉ. ए. बी. गायकवाड यांनी रु.५१,०००/- देणगी दिल्याच्या बाबीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेऊन डॉ. ए. बी. गायकवाड यांना आभाराचे पत्र द्यावे असे ठरले.**

**विषय क्र. ३५- एम. एड. या अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्र समाप्ती व द्वितीय सत्र प्रारंभ मध्ये बदल करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

शैक्षणिक वर्ष २००७-०८ या वर्षासठी विविध विद्याशाखासाठी सत्रारंभाच्या तारखा व्यवस्थापन परिषदेने निश्चित केलेल्या आहेत. सोबत शिक्षणशास्त्र विभागप्रमुख, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व प्राचार्य कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर यांचे सत्र समाप्ती व द्वितीय सत्र प्रारंभ यामध्ये बदल करण्याबाबतचे पत्र सोबत जोडले आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.३५ - एम.एड. या अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्र समाप्ती दि. १ नोव्हेंबर, २००७ आणि द्वितीय सत्र प्रारंभ दि.२७ नोव्हेंबर, २००७ असा बदल करण्यास मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. ३६- ज्या महाविद्यालयात मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र (CAP) आहे तेथील परीक्षक आणि परिनिरीक्षक यांना रु.५०/- स्थानिक प्रवास भत्ता देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी:- विद्यापीठ परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मध्यवर्ती मूल्यमापन करण्याचे काम विविध महाविद्यालयांना दिले जाते. उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनासाठी परीक्षक आणि परिनिरीक्षक यांना प्रवास भत्ता किंवा स्थानिक प्रवास भत्ता दिला जातो. तथापि उन्हाळी आणि हिवाळी सुट्टयांच्या कालावधीत शासनाकडून शिक्षकांना प्रवास भत्ता दिला जात नाही. ज्या महाविद्यालयांमध्ये उत्तरपत्रिकांचे मूल्यमापनाचे काम दिलेले असते. अशा महाविद्यालयातील शिक्षकांना सुट्टयांच्या कालावधीमध्येसुध्दा स्थानिक प्रवास भत्ता दिला जात नाही. परंतु इतर महाविद्यालयातून या कामासाठी येणाऱ्या शिक्षकांना स्थानिक प्रवास भत्ता दिला जातो. मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र दिलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांची स्थानिक प्रवास भत्ता देण्यात यावा अशी सातत्याने मागणी होत आहे. मा.प्र.कुलगुरु यांच्याबरोबर दि.२८/०९/२००७ रोजी ऑक्टोबर/नोव्हेंबर २००७ मधील विद्यापीठ परीक्षांचे मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र (CAP) देण्यासंबंधीच्या झालेल्या बैठकीत महाविद्यालयातील शिक्षकांनाही सुट्टयांच्या कालावधीत मूल्यमापन परिक्षक, मॉडरेटर यांना स्थानिक प्रवास भत्ता रु.५०/- देण्यात यावा अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेकडे करण्याचे ठरले आहे.

सबब, वरील बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र.३६ - ज्या महाविद्यालयात व विद्यापीठ परिसरात मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र (CAP) आहे तेथील परीक्षक आणि परिनिरीक्षक यांना उन्हाळी व हिवाळी सुट्टीमध्ये रु.५०/- स्थानिक प्रवास भत्ता देण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. ३७- मा. कुलपती यांना पाठविलेल्या पत्राबाबत.**

**ठराव क्र.३७ - दि.२२/८/०७ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेसंदर्भात तत्कालीन कुलगुरु यांनी महामहिम राज्यपाल तथा मा.कुलपती यांना पाठविलेला अहवाल वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा असल्याची शक्यता असल्याने विद्यापीठ हितासाठी तो अहवाल रद्द करावा अशी विनंती महामहिम राज्यपाल तथा मा.कुलपती यांना करण्यात यावी असे ठरले.**

मा. अध्यक्ष यांनी सर्व व्यवस्थापन परिषदेचे आभार मानले. यानंतर मा. सचिव यांनी मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
**प्रा. डॉ. एन. एन. मालदार**
**अध्यक्ष.**